
अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 02 ऑक्टोबर 2025 वर्ष 11 वे ✱ अंक 07 वा ✱ ब्रम्हपुरी पाने 6 किंमत 2 रूपये

## जगातील दुसऱ्या क्रमांकाची ठेंगणी मुलगी ब्रम्हपुरी तालुक्यात
## अवघी २.३ फुट उंची; जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्र बहाल

ब्रम्हपुरी/का.प्र.

जगात वेगवेगळे विक्रम नोंदवले जातात. त्यासाठी 'इंटरनॅशनल बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' प्रसिद्ध आहे. असचं एक रेकॉर्ड सध्या समोर आलं आहे. हे रेकॉर्ड आहे जगातील सर्वात ठेंगण्या मुलीचं. हो जगातील दुसऱ्या क्रमांकाची ठेंगणी मुलगी. विशेष म्हणजे ही मुलगी चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी तालुक्यात सापडली आहे. तिची उंची मोजल्यानंतर तिने हे रेकॉर्ड आपल्या नावावर केलं आहे. शिवाय त्याबाबतच प्रमाणपत्र ही

जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्र स्विकारतांना ज्ञानेश्वरी



तिला 'इंटरनॅशनल बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मार्फत देण्यात आलं आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील मुलगी जगातील दुसऱ्या क्रमांकाची ठेंगणी मुलगी ठरली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी तालुक्याची कन्या ज्ञानेश्वरी दुणेदार हिने आपल्या उंचीमुळे जगात इतिहास रचला आहे.

दोन फूट तीन इंच एवढी तिची उंची आहे. त्यामुळे तिची नोंद आता 'इंटरनॅशनल बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये झाली आहे. ज्ञानेश्वरी दुणेदार असे तिचे नाव असून, ती ब्रह्मपुरी तालुक्यात परसोडी येथील रहिवासी आहे. आईवडील शेती करतात. तिची एक बहिण चंद्रपूर येथे वास्तव्याला आहे. सध्या ती बहिणीकडेच मुक्कामी आहे. यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथील आदर्श अपंग विद्यालयात बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थीनी असलेली ज्ञानेश्वरी दररोज शाळेत बसने ये-जा करते. शिक्षणाची आवड असल्याने वणी येथे जाणे येणे करतांनच अलंकार सावळकर व योगेश गोखरे या युवकांना ती रस्त्याच्या कडेला चालताना दिसली. तिची उंची बघून त्यांना आश्चर्य वाटले. विचारपूस केली आणि माहिती घेऊन उंची मोजली. तेव्हा लक्षात आले की, जिवंत असलेल्या व्यक्तींमध्ये तिची उंची जगात दुसऱ्या क्रमांकाची आहे. तिची कुठेतरी नोंद व्हायला हवी आणि तिला ओळख प्राप्त व्हावी,

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## चंद्रपूर जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा - कॉंग्रेस
### उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

ब्रम्हपुरी/का.प्र.

सततच्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, सरकारने तातडीने चंद्रपूर जिल्ह्यात सरसकट ओला दुष्काळ जाहीर करावा, या मागणीसाठी ब्रम्हपूरी तालुका व शहर कॉंग्रेसच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनात शेतकऱ्यांसाठी तातडीने आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे.



निवेदनामध्ये म्हटले आहे की, सततच्या पावसामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकरी हवालदील झाला असुन खरीप हंगामातील उभी पिके जमिनीमध्ये पूर्णपणे खराब झाली आहेत. कापणीला आलेल्या पिकांसह भाजीपाला पिकाचे सुध्दा प्रचंड नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून, अनेक शेतकरी आधीच कर्जबाजारी असल्याने त्यांच्यावर दिवाळखोरीचे संकट वाढत आहे. या संकटाचा फटका केवळ शेतकऱ्यांनाच बसलेला नाही तर शेतमजूर, व्यापारी आणि ग्रामीण उद्योगांवरही याचा नकारात्मक परिणाम झाला आहे. त्यामुळे चंद्रपूर जिल्हा तातडीने ओला दुष्काळग्रस्त जाहीर करणे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सोबतच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपयांची तातडीची आर्थिक मदत द्यावी. शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ करून कर्ज वसुलीला स्थगिती द्यावी. शेतकऱ्यांच्या मुलांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. या मागण्या मान्य न

(उर्वरित पान क्र. ६ वर)

विजयादशमी, गांधी जयंती व धम्म चक्र प्रवर्तन दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा




### ब्रम्हपुरी न.प. निवडणूक
### : मतदार यादीचा कार्यक्रम :

| | |
|---|---|
| १. प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे : | दि. ०८ ऑक्टोबर २०२५ |
| २. प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना : | दि. ०८ ते १३ ऑक्टोबर २०२५ |
| ३. अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करून प्रसिध्द करणे : | दि. २८ ऑक्टोबर २०२५ |
| ४. मतदान केंद्राची यादी प्रसिध्द करणे : | दि. ०७ नोव्हेंबर २०२५ |

संपादकीय...

## तरूणांना रोजगार मिळावा

जगातील सर्वाधिक तरुण भारतात आहेत. आपण याच तरुणांच्या जोरावर महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ डॉ.ए.पि.जे. अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. तरुणांच्या या ऊर्जेचा योग्य वापर झाल्यास भारताला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही असा ठाम विश्वास डॉ. अब्दुल कलाम यांना होता. डॉ. अब्दुल कलाम यांच्यासारख्या द्रष्ट्या व्यक्तीने जे ओळखले ते आजच्या राज्यकर्त्यांना मात्र ओळखता आले नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. कारण आजच्या तरुणांच्या ऊर्जेचा, त्यांच्या गुणवत्तेचा उपयोग सरकारला करून घेता येता नाही किंवा सरकार जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करत आहे. देशात तरुणांच्या हाताला काम नाही. ज्या तरुणांचे शिक्षण पूर्ण झाले आहे असे अनेक तरुण नोकरीच्या शोधात आहेत. तर परदेशात ज्या तरुणांना नोकरीसाठी जायचे आहे त्यांना पासपोर्ट व्हिसा कर वाढवल्यामुळे त्यांना परदेशात नोकरीसाठी जाता येत नाही हे वास्तव आहे.

देशातील बेरोजगारीच्या समस्येचे भीषण वास्तव समोर आले आहे. देशात तरुण पदवीधर बेरोजगारी उच्च स्तरावर आहे, तर कमी शिकलेले तरूणही बेरोजगार आहेत पंरतू कमी शिकलेले तरूण मिळेल ते काम करित आहे आणि आता उच्च शिक्षित ही कोणतेही काम करण्याठी धरपडत आहेत. उच्च माध्यमिक स्तरावरील पात्रता असलेल्या आणि 25 वर्षांपेक्षा कमी वयोगटातील तरुणांमध्ये बेरोजगारीचा मोठ्या प्रमाणात आहे. याचाच अर्थ कमी शिकलेल्या पासून पदवीधर असलेल्या तरुणांपर्यंत सर्वांनाच बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत आहे. ही आकडेवारी चिंताजनक आहे. देशातील 40 टक्क्यांहून अधिक तरुण जर बेरोजगार असतील तर त्या तरुणांच्या मानसिकता काय असेल याचा विचार न केलेलाच बरा. शिक्षण आहे, पदवी आहे, काम करण्याची उर्मी आहे, कुटुंबासाठी, देशासाठी काही तरी करुन दाखवण्याची इच्छा आहे मात्र नोकरी नाही अशी अवस्था तरुणांची आहे. नोकरी नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड नैराश्य आले आहे. आपण इतके शिकूनही आपल्या शिक्षणाचा उपयोग होत नाही त्यामुळे तरुण प्रचंड अस्वस्थ आहेत. शासन रोज नवे परिपत्रक काढून तरुणांचा रोजगार हिरावून घेत आहे. सध्या तर खाजगीकरणाचे पेव फुटले आहे त्यामुळे सरकारी नोकरी मिळवण्याचे तरुणांचे स्वप्न स्वप्नच राहणार आहे. वास्तविक गेल्या अनेक वर्षांपासून सरकारी नोकर भरती झालेली नाही. नोकर भरतीसाठी सरकार जाहिरात काढते. हजारो रुपये परीक्षा फी घेऊन तरुणांची परीक्षा घेते मात्र प्रत्यक्ष नोकरी काही देत नाही. कधी पेपर फुटीचे तर आणखी काही कारण देऊन भरती पुढे ढकलली जाते. आज सरकारच्या सर्वच खात्यात कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. एक लिपिक चार चार टेबल सांभाळीत आहे, एक शिक्षक चार चार वर्ग शिकवत आहे, गेली अनेक वर्षे पदोन्नती झालेली नाही जर सरकारने सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय रद्द करून भरती केली तर देशातील बेरोजगारी काही प्रमाणात का होईना कमी होईल मात्र सरकारला तरुणांच्या रोजगाराचे काहीही देणे घेणे नाही. शिक्षण असून नोकरी नाही, स्वतः चा व्यवसाय करावा म्हटलं तर भांडवल नाही त्यामुळे आजचा तरुण प्रचंड अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेचा उद्रेक केव्हाही होऊ शकतो. जर तरुणांच्या अस्वस्थतेचा उद्रेक झाला तर भल्या भल्यांना पळता भुई थोडी होईल म्हणूनच सरकारने तरुणांच्या हाती रोजगार द्यावा. त्यांच्यात असलेल्या ऊर्जेचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करून घ्यावा. देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने ठोस प्रयत्न करावेत.

# संशोधन केंद्र नुतनीकरणासाठी उच्चस्तरीय समितीची ने.हि. महाविद्यालयाला भेट



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथे नुकतीच संशोधन केंद्राच्या नूतनीकरणाकरिता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली तर्फे नियुक्त उच्चस्तरीय समितीने महाविद्यालयाला भेट दिली.

या सभेचे अध्यक्षस्थान संस्थेचे सचिव अशोकजी भैय्या यांनी भूषविले. संशोधन सल्लागार समितीचे समन्वयक डॉ.योगेश ठावरी यांनी संशोधन केंद्राच्या नूतनीकरणाचा प्रस्ताव गोंडवाना विद्यापीठाकडे सादर केला होता. या समितीचे अध्यक्ष डॉ.श्रीराम कावळे, प्र-कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ हे होते. सदस्य म्हणून डॉ.अशोक ए. मिस्त्री (अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा), डॉ.निरेन कठाळे (सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर), डॉ.संजय गवळी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर), डॉ. श्याम खंडारे (अधिष्ठाता, मानव विज्ञान विद्याशाखा), डॉ. योगराज दुधपचारे (जनता महाविद्यालय, चंद्रपूर), संजय के.लाटेलवार (श्री. शिवाजी महाविद्यालय, राजुरा), डॉ. अक्षय धोटे (सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर), डॉ. जयेश एन. चक्रवर्ती (अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) आणि मा. डॉ. राहुल सावलीकर (सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर) यांचा समावेश होता.

समितीने महाविद्यालयातील रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, भूगोल, मराठी, इंग्रजी व वाणिज्य विषयांच्या संशोधन केंद्राच्या प्रयोगशाळा, ग्रंथालय, संशोधन साधनसामग्री तसेच इतर सुविधांची तपासणी करून समाधान व्यक्त केले व ग्रंथालयाप्रती गौरवोद्गार काढले व सदर अहवाल विद्यापीठास सदर केला. या अहवालाच्या आधारे संशोधन केंद्राचे नूतनीकरण निश्चित होणार असून, येत्या काळात ग्रामीण क्षेत्रातील संशोधकांना व प्राध्यापकांना समाजहितासाठी संशोधन कार्य अधिक गतिमान करता येईल अशी अपेक्षा संस्थेचे सचिव अशोकजी भैयांनी याप्रसंगी व्यक्त केली.

या सभेचे कार्य ने.हि. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले तसेच या संशोधन केंद्राच्या नूतनीकरणाच्या प्रक्रियेत डॉ.राजेंद्रकुमार डांगे, डॉ.रेखा मेश्राम, डॉ.धनराज खानोरकर, डॉ.असलम शेख, डॉ.रतन मेश्राम व संशोधन सल्लागार समितीचे सादस्य डॉ.योगपुडे, डॉ.नागभिडकर व अधीक्षक संगीता ठाकरे, रोशन डांगे व रुपेश चामलाटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# विजया दशमी अधर्मावर धर्माचा विजय उत्सव - आल्हाद शिनखेडे

ब्रम्हपुरी/का.प्र.

राष्ट्र सेविका समितीचा विजया दशमी उत्सव ब्रह्मपुरी येथे साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेले रा. स्व. संघाचे ब्रह्मपुरी जिल्हा सहकार्यवाह मा. आल्हादजी शिनखेडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, 'काळापासून शक्तीची उपासना आपल्या हिंदू संस्कृतीचे रक्षण करणाऱ्या संघ आणि समितीच्या कार्यातून दिसून येते. विजया दशमी हा अधर्मावर धर्माचा विजय साजरा करण्याचा उत्सव आहे.' त्यांनी पुढे कर्नाटकातील राणी अबक्का यांच्या जयंती वर्षाचे स्मरण करून दिले तसेच संघाचे 'पंच परिवर्तन – स्वदेशी, नागरिक कर्तव्य, पर्यावरण रक्षण, सामाजिक समरसता आणि कुटुंब प्रबोधन' यांवर विशेष प्रकाश टाकला. 'माँ जिजाऊ शिवाय छत्रपती घडू शकत नाही. विविध संघटना स्वतंत्र असल्या तरी त्यांचा विचार एकच आहे. स्वभाषा, स्वजागरण, स्वदेशी,



स्वभूषा, नागरिक रक्षण आणि कर्तव्य भाव यातूनच राष्ट्रशक्ती घडते,' असे उद्गार त्यांनी काढले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा एनसीसी ऑफिसर कॅप्टन कुलजीत कौर गील उपस्थितांना प्रेरित केले. कार्यक्रमात श्लोक सुष्मिता शिनखेडे, अमृतवचन साक्षी पुल्लीवार, वैयक्तिक गीत प्राची जोशी, ऋणनिर्देश शरयु भानारकर यांनी मानले. उत्सवाची सांगता वंदे मातरमने झाली.

## विनोदिनी

तालुक्याच्या ठिकाणी कार्यरत असलेला तलाठी एकदा घरी सत्यनारायणाची पुजा ठेवतो. त्याकरीता जिल्हाधिकारी साहेबाला जेवणाचे निमंत्रण देतो...

जिल्हाधिकारी बायकोसोबत तलाठ्याच्या घरी जेवायला जातात....

तलाठ्याच्या घरचं वैभव, थाटमाट, गाड्या, पाहून जोगाता जोगाता...

जिल्हाधिकाऱ्याची पत्नी जिल्हाधिकारी साहेबांला हळूच विचारते...

काय हो, जिल्हाधिकारी साहेब... अजून किती वर्षांनी तुम्ही तलाठी होणार हो...?

# ने.हि. महाविद्यालयाचे विद्यार्थी गोंडवाना विद्यापीठात अव्वल, तीन मेरीटमध्ये

ब्रह्मपुरी/का.प्र.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील शैक्षणिक सत्र २०२४-२५ ची विविध विषयाची गुणवत्ता यादी विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली असून यामध्ये नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरीतील एम. ए (मराठी) विषयाच्या गुणवत्ता यादीत पाचपैकी तीन विद्यार्थी







नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील आहेत.

यामध्ये प्रथम मेरिट फराहनाज जब्बारखान पठाण (७६४-९.५५) ही प्रथम मेरिट असून स्नेहा विलास बनपुरकर (७६४-९.५५) ही द्वितीय तर पियूष दामोदर बहेकर( ७६०-९.५०) हा तृतिय मेरिट आला आहे. याशिवाय अंबिका मांढरे ही बी.ए.मधून मेरिट आलेली आहे.

या सर्व विद्यार्थ्यांचे नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया, प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, मराठी विभागप्रमुख डॉ.धनराज खानोरकर, डॉ. प्रकाश वट्टी, डॉ. पद्माकर वानखडे, स्वाती धनविजय याशिवाय समस्त प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन करुन त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**नियमित वाचा ब्रम्हपुरी समाचार**

# गांगलवाडी येथे पं. दिनदयाल उपाध्याय जयंती साजरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील मध्यवर्ती गांगलवाडी या गावी करिअर कंप्यूटर इन्स्टिट्यूट आणि



गांगलवाडी पंचायत समिती गणामधील भाजपा कार्यकर्ते यांच्या संयुक्त विद्यमाने 'पंडित दिनदयाल उपाध्याय' यांची जयंती साजरी करण्यात आली. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या फोटोचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले.

यावेळी विचार प्रगट करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.रामलाल दोनाडकर म्हणाले की, पंडित दिनदयाल उपाध्याय हे एक कुशल संघटक, आदर्शवादी राजनेते, मुलत: विचारवंत आणि परिव्राजक संताप्रमाणे क्रियाशील राहणारे संघ प्रचारक होते. त्यांचे विचार केवळ एखाद्या राजकीय पक्षापूरते सिमित नव्हते तर संपूर्ण मानवतेच्या कल्याणाचे मंत्र होते. त्यांनी दिलेला 'एकात्म मानवतावाद' आणि 'अंत्योदय' हा विचार आपल्याला समाजाच्या विकासाचा मार्ग दाखवतो. त्यांचे विचार सकल मानव जातीच्या विकासाच्या केंद्रस्थानी आहेत.

कार्यक्रमाला सुनीताताई ठवकर माजी उपसभापती, शीलाताई गोंधोळे तालुकाध्यक्ष महिला मोर्चा, राजेश्वरजी मगरे अध्यक्ष आदिवासी मोर्चा, पांडुरंग भोयर, अनिल तिजारे सरपंच, उमेश घुले सरपंच, संजय भोयर ग्रामपंचायत सदस्य, ज्ञानेश्वर भोयर माजी सरपंच, चुमदेव जांभुळकर माजी उपसरपंच, संजय बन्सोड आणि करिअर इंन्स्टुट गांगलवाडीचे विद्यार्थी उपस्थीत होते.

# आम. किर्तीकुमार भांगडिया यांनी घेतले ब्रम्हपुरीच्या भवानी मातेचे दर्शन





ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरीतील भवानी माता मंदिर भाविक भक्तांचे श्रद्धास्थान आहे. सध्या नवरात्री उत्सव सर्वत्र साजरा करण्यात येत आहे. चिमूर विधानसभा क्षेत्र आमदार कीर्तीकुमार (बंटी) भांगडिया हे ब्रम्हपुरी येथे एका कार्यक्रमानिमित्ताने आले असता त्यांनी भवानी माता मंदिर येथे जाऊन दर्शन घेत विधिवत पूजन केले. यावेळी आम. भांगडिया यांचा मंदिर ट्रस्ट कडून सत्कार करण्यात आला. ब्रम्हपुरी भाजप नेते पदाधिकारी कार्यकर्ते व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# गोवा महाविद्यालयात 'एक पेड़ माँ के नाम' उपक्रम

## वृक्षारोपण व देहदान विषयावर रासेयोचे पथनाटच सादरीकरण

नागभीड/प्रतिनिधी

गो.वा. महाविद्यालय नागभीड, राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन सप्ताह अंतर्गत 'एक पेड माँ के नाम' उपक्रमात वृक्षारोपण व देहदान विषयावर पाथानााटचा




२६ सप्टेंबर २०२५ रोज शुक्रवार ला राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नगर परिषद, नागभीडच्या संयुक्त विधमाने राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाच्या औचित्याने स्वच्छता ही सेवा अभियान अंतर्गत सादर करण्यात आले.

या उपक्रमा अंतर्गत नागपूर- चंद्रपूर हाय वे च्या मध्ये असलेल्या दुभाजकावर १५० वृक्षांचे रोपण करण्यात आले. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ९२ स्वयंसेवक, समन्वयक प्रा.डॉ. चंद्रशेखर हनवंते, कार्यक्रम अधिकारी प्रा. मंगेश देवढगले, नगर परिषद मुख्याधिकारी सोनम देशमुख व कर्मचारी उपस्थित होते. वृक्षारोपनाकरिता खड्डे करून त्यामध्ये कम्पोस्ट खत टाकून रोप लावण्यात आले. त्या नंतर सर्व रोपांना पाणी घालण्यात आले. या नंतर प्रा.डॉ. गणेश सांगोळकर लिखित व दिग्दर्शित 'देहदान' या विषयावर राम मंदिर चौक, नागभीड येथे मराठी व रा.से.यो. विभागाच्या संयुक्त विद्यमाने पथ नाट्य सादर करण्यात आले या मध्ये एकूण १७ रा.से.यो स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सिंग याच्या मार्गदर्शनात घेण्यात आला.

# अवैध विदेशी दारूसह दोघांना अटक

ब्रह्मपुरी/का.प्र.

पोलिसांनी सोमवारी रात्री अवैध विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या दोघांना अटक केली. या कारवाईत सुमारे ६ लाख ४७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

एका चारचाकीतून विदेशी दारूची वाहतूक होत असल्याच्या माहितीवरून पॉलिटेक्निक कॉलेजजवळ नाकाबंदी लावण्यात आली. रात्री १०.१५ वाजता (एमएच ४० वाय ६१४९) ही पांढऱ्या रंगाची संशयित कार अडवण्यात आली. कारमध्ये १५ खोके विदेशी दारूचे आढळले.

# फार्मसिस्ट दिनी रूग्णांना फळवाटप




ब्रम्हपुरी/का.प्र.

जागतिक फार्मासिस्ट दिनाच्या निमित्ताने ब्रम्हपुरी तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेच्या वतीने रूग्ण सेवेची जाणिव ठेवून उपजिल्हा रुग्णालय ब्रम्हपुरी येथे रूग्णांना फळ व बिस्कीटांचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी तालुका अध्यक्ष सुरेश आतवार, तालुका सचिव लोकेश शेंडे, ऋषी गोखरे, अशोक कलंत्री, मनमोहन कलंत्री, विजय सेलोकर, ब्रिजमोहन राठी, सौरभ काबरा, कुंदन चापले, संदिप कापगते, रितेश डोरले, रणजित फटिंग, उदासी, जनार्दन गेडाम, देवानंद कांबळे, मनोज भूपाल, पप्पू येडे उपस्थित होते.

# स्टॅनफोर्डच्या शास्त्रज्ञांच्या यादीत ने.हि. महाविद्यालयातील डॉ. अतुल येरपुडे

## संशोधक डॉ. चंद्रहस्य नंदनवार यांचाही समावेश

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयासाठी अभिमानाचा क्षण म्हणून, भौतिकशास्त्र विभागातील सहा. प्राध्यापक डॉ.अतुल एन. येरपुडे आणि संशोधक डॉ. चंद्रहस्य नंदनवार यांना स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जगातील टॉप २% शास्त्रज्ञांच्या प्रतिष्ठित क्रमवारीत स्थान देण्यात आले आहे. ही मान्यता जागतिक स्तरावर वैज्ञानिक संशोधन आणि नवोपक्रमात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान दर्शवते.

उल्लेखनीय म्हणजे, डॉ. अतुल येरपुडेनी सलग दुसऱ्यांदा हा सन्मान मिळवला. २०२४ आणि २०२५ मध्ये त्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे, जी एक दुर्मिळ आणि प्रशंसनीय कामगिरी आहे. स्टॅनफोर्ड यादीला शैक्षणिक उत्कृष्टतेचा एक मानदंड म्हणून व्यापकपणे पाहिले जाते. ज्यामध्ये अशा शास्त्रज्ञांना अधोरेखित केले जाते ज्यांचे संशोधन प्रभाव, प्रशस्तिपत्रे आणि योगदान जागतिक वैज्ञानिक प्रगतीवर प्रभाव पाडतात. एन.एच. कॉलेजमधील दोन विद्वानांच्या समावेशामुळे केवळ संस्थेलाच नव्हे तर या प्रदेशातील शैक्षणिक समुदायालाही मोठी ओळख मिळाली आहे.



डॉ. अतुल येरपुडे



डॉ. चंद्रहस्य नंदनवार

नेवजाबाई भैया हितकारिणी एज्युकेशन सोसायटीचे सचिव अशोक भैया यांनीही डॉ. अतुल येरपुडे आणि डॉ. चंद्रहस्य नंदनवार यांचे त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अभिनंदन केले. यावेळी ते म्हणाले, यांची जागतिक मान्यता ही दर्जेदार शिक्षण आणि अत्याधुनिक संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी सोसायटीच्या वचनबद्धतेचे प्रमाण आहे. प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकर यांनी प्राध्यापकांसह दोन्ही विद्वानांचे मनापासून अभिनंदन केले आणि म्हटले की, एन.एच. कॉलेज, ब्रम्हपुरी येथे जोपासलेली ही शैक्षणिक ताकद आणि संशोधन संस्कृती यामुळे सिद्ध होते. याशिवाय डॉ. आर. एस. मेश्राम, प्रा. डी. एम. परशुरामकर, डॉ. ए. जे. मुंगोले, रोशन डांगे आणि विलास खोब्रागडे यांनीही त्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

# एनक्यूएएस केंद्रीय पथकाची गांगलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट



ब्रह्मपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्हा परिषद पंचायत समिती ब्रह्मपुरी अंतर्गत येणाऱ्या गांगलवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला नुकतेच एन क्यू ए एस केंद्रीय पर्यवेक्षण पथकाने भेट दिली मदर पिएचसी नावाने ओळखल्या जाणाऱ्या या आरोग्य केंद्राची पाहणी केली आणि विविध समस्या जाणून घेतल्या.

यावेळी डॉ.कटारे साहेब, जिल्हा आरोग्य अधिकारी चंद्रपूर डॉ.सुखेदेवे तालुका वैद्यकीय अधिकारी, ब्रम्हपुरी, डॉ.अभिजीत भुरले वैद्यकीय अधिकारी गांगलवाडी, डॉ.शुभम दखणे सर, डॉ. अमन पंडेल वैद्यकीय अधिकारी आरोग्यवर्धिनी चौगान, डॉ.राहुल सहारे सर, डॉ.फटिंग मॅडम व प्रा.आ.केंद्र गांगलवाडी येथील सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# देसाईगंज येथे रंगणार ५ वे झाडीपट्टी नाट्य संमेलन

ब्रम्हपुरी/का.प्र.

झाडीपट्टी नाट्य विकास मंडळ, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली द्वारा आयोजित ५ वे झाडीपट्टी नाट्यसंमेलनाचे भव्य आयोजन दिनांक ४ व ५ ऑक्टोंबर २०२५ ला नाट्यसंस्थेची बाजारपेठ असलेल्या देसाईगंज (वडसा) च्या आदर्श महाविद्यालयाच्या प्रांगणात केले गेले आहे.

या ५ वे झाडीपट्टी नाट्यसंमेलनाचे संमेनाध्यक्ष प्रसिद्ध विनोदी नाटयकलावंत के. आत्माराम यांची निवड करण्यात आली असून उद्घाटन सहपालकमंत्री नाम. ॲड. आशिष जयस्वाल करणार आहेत. या समारंभाचे अध्यक्ष माजी मंत्री, आमदार विजय वडेट्टीवार राहणार असून संमेलनाचे स्वागताध्यक्ष आमदार रामदास मसराम असतील. विशेष अतिथीमध्ये खासदार डॉ नामदेव किरसान, आमदार नानाभाऊ पटोले, आमदार धर्मराव बाबा आत्राम, माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार सुधाकर अडबले, आमदार अभिजित वंजारी, झाडीबोली महर्षी डॉ. हरिश्चंद्र बोरकर, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, जिल्हाधिकारी अविश्रांत पंडा, नटवर्य डॉ. शेखर डोंगरे, विशेष आकर्षण हास्यसम्राट भारत गणेशपुरे, पद्मश्री डॉ. परशुराम खुणे यांच्या उपस्थितीत ०४ ऑक्टोंबर २०२५ ला सकाळी ११.३० वा. संमेलनाचे उद्घाटन पार पडेल.

# नेवजाबाई हितकारिणी विद्यालयात किशोरवयीन आरोग्य मार्गदर्शन शिबीर

ब्रम्हपुरी/का.प्र.

किशोरवय हा काळ प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील एक अतिशय महत्त्वाचा आणि गरज लक्षात घेऊन नेवजाबाई हितकारिणी उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपुरी आणि एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र, विद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. पी.आर.जिभकाटे, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. कु.नितू खाडीलकर या उपस्थित होत्या.



संवेदनशील टप्पा असतो. या काळात शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक परिवर्तन वेगाने घडत असतात. या टप्प्यावर विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शनाची ग्रामीण रुग्णालय ब्रम्हपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयामध्ये 'किशोरवयीन आरोग्य मार्गदर्शन' कार्यक्रम नुकतेच संपन्न झाले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी

सदर कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक प्राजक्ता देवगडे, समुपदेशक ग्रामीण रुग्णालय ब्रम्हपुरी यांनी कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना, किशोरवयात होणारे व्यक्तीतील शारीरिक, मानसिक, भावनिक बदल आणि या वयात घ्यावयाची काळजी व आवश्यक असणारी समज यावर मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून अमली पदार्थ व्यसनामुळे होणारे गंभीर दुष्परिणाम व त्यापासून दूर जाण्यासाठी उपाययोजना, व्यक्तीला एच.आय.व्ही. एड्स, कर्करोग यासारखे भयंकर आजार होण्याची कारणे आणि ते होऊ नये यासाठी घ्यावयाची खबरदारी, मुलींनी मासिक पाळी दरम्यान घ्यावयाची काळजी आणि स्वच्छता, पौष्टिक आहाराचे महत्व इ. विषयावर भाष्य करतांना विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून संवाद साधला.

[illegible] प्रा.पी.आर.जिभकाटे यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात, किशोरवय हा जीवनातील अत्यंत महत्त्वाचा व नाजूक काळ आहे. या टप्प्यावर योग्य मार्गदर्शन, सहकार्य मिळाल्यास विद्यार्थी भविष्यातील जबाबदार नागरिक बनू शकतात हे मत मांडतांना विद्यार्थ्यांनी आपले व्यक्तिमत्त्व उंचवण्याचा नेहमी प्रयत्न करावा, असा आशावाद व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि पाहुण्यांचे आभार डॉ. पी. एन. बेंदेवार यांनी मानले.

# कृषीउडान फार्मर प्रो.कंपनीचा लाभांश वितरण सोहळा उत्साहात संपन्न




ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील पिंपळगाव ( भो.) येथे दि. २९/०९/२०२५ सोमवार रोजी भारत सरकारच्या १०००० एफ पी ओ निर्माण व संवर्धन योजनेअंतर्गत राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) द्वारा अर्थसहाय्यित कृषी विभाग (आत्मा) द्वारे निरीक्षित व आय एफ एफ डी सी द्वारा क्रियान्वीत कृषीउडान फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. सावलगाव ता ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर यांची चौथी वार्षिक सर्वसाधारण सभा कंपनीचे कार्यालय पिंपळगाव (भो) येथे संपन्न झाली. प्रसंगी कंपनीच्या सभासदांना लाभांश वितरणाचा सोहळा पार पडला.

कंपनीचे सीईओ अमित कुथे यांनी कंपनीच्या आर्थिक वर्षातील कामकाजाचा आढावा सादर केला व जमा-खर्चाचा अहवाल सादर करून कंपनीने केलेल्या उपक्रमांची माहिती दिली. या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून उप कृषी अधिकारी अमित केराम उपस्थित होते. अध्यक्षस्थानी राजेश तलमले , अध्यक्ष कृषीउडान फार्मर प्रोद्युसर कंपनी होते. प्रमुख पाहुणे शिरसाट साहेब तांत्रिक अधिकारी विभागीय कृषी विभाग नागभीड, विनोद सोरदे मंडळ कृषी अधिकारी ब्रम्हपुरी, तर प्रमुख उपस्थितीत अमित हातझाडे ता. तंत्र. व्यव. (आत्मा), चौधरी साहेब ता. तंत्र. व्यव. (आत्मा ) नागभीड, प्रशांत शहारे, कृषिउडांन कंपनीचे उपाध्यक्ष सुरेश दुनेदार , सर्व संचालक मंडळ व शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्याम भुसेवार (कृषी व्यवसाय तज्ञ IFFDC) यांनी केले. सूत्रसंचालन कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित कुथे यांनी केले तर आभार प्रदर्शन लेखापाल रामप्रसाद तलमले यांनी केले.

❁❁❁❁❁❁

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये नवरात्री उत्सवाचा जल्लोष

ब्रम्हपुरी/का.प्र.









एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये या वर्षी सुध्दा गरबा कार्यक्रम दि. २४ सप्टेंबर २०२५ ला मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला.

नवरात्री नऊ दिवस उत्साहात आणि उत्साहाने भरलेला हा उत्सव असतो. दुर्गा देवीची उपासना करण्याचा एक अवसर (योग) आहे. यामुळे सर्वांना एकत्र येण्याची संधी मिळते. म्हणूनच या शुभकार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. या कार्यक्रमाला स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम, स्कुलचे सर्व शिक्षक उपस्थित होते. नवरात्रीच्या या पावन प्रसंगी सर्वप्रथम संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर यांच्या हस्ते दुर्गादेवीच्या प्रतिमेची पूजा करून आरती करण्यात आली. त्यानंतर कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली.

कार्यक्रमामध्ये प्रि स्कुलच्या नर्सरी ते केजी-२ या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्यांनी नवरात्री उत्सावाचा जल्लोष विविध गीतांच्या तालावर थिरकत साजरा केला. कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी पारंपारिक पोशाख परिधान केले. त्यामुळे स्कुलचे वातावरण बहरून आले होते. सुंदर असे दृश्य पहायला मिळाले. या कार्यक्रमाचे संपूर्ण श्रेय शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांना जाते.

# ने.हि. महाविद्यालयात पं. दिनदयाल उपाध्याय जयंती



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित केल्या गेला. सर्वप्रथम महाविद्यालयाचे कार्य. प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, प्रा. मेजर विनोद नरड यांनी प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले.

त्यानंतर उपस्थित डॉ. राजेंद्र डांगे, डॉ. रेखा मेश्राम, डॉ. धनराज खानोरकर, डॉ. असलम शेख, डॉ. मोहन कापगते, डॉ. युवराज मेश्राम, डॉ. भास्कर लेनगुरे, डॉ. सुनिल चौधरी, डॉ. रतन मेश्राम, डॉ. प्रकाश वट्टी, डॉ. पद्माकर वानखडे, डॉ. अरविंद मुंगोले, डॉ. अतुल येरपुडे, डॉ. विवेक नागभीडकर, प्रा. बालाजी दमकोंडवार, डॉ. हर्षा कानफाडे, प्रा. जयेश हजारे, प्रा. धिरज आतला, अधीक्षक संगीता ठाकरे, रुपेश चामलाटे, दत्तू भागडकर इत्यादी मान्यवरांनी प्रतिमेला पुष्प वाहून आदरांजली वाहिली.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. आतला यांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ. खानोरकर, डॉ. मेश्राम, जयंत महाजन यांनी सहकार्य केले.

**जल है तो कल है...**

**... QUOTES ...**

**“I suppose leadership at one time meant muscles; but today it means getting along with people.”**

**- Mahatma Gandhi**

**चा रो ळी**

प्रत्येक नागरिकाने लागू असलेला कर
कर्तव्य बुध्दीने भरणे आवश्यक आहे...
असे मास्तर म्हणताच, अधिकारी म्हणाले,
नगदीने भरणे आवश्यक आहे...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# जागतिक औषध निर्माता दिनानिमित्य भव्य जनजागर रॅली

ब्रम्हपुरी/का.प्र.




दि.२५ सप्टेंबर २०२५ रोजी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली व राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात जागतिक औषध निर्माता दिनाचे चे उत्साहात आयोजन करण्यात आले. या वेळेस जनजागरण रॅली, वृक्षारोपण व भव्य रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

प्रसंगी फ्लॅश मॉब, आरोग्य मार्गदर्शक पथ नाट्य, मूक नाट्य या कार्यक्रमाचे सादरीकरण ब्रम्हपुरीतील शिवाजी चौक, सावरकर चौक, संत रविदास चौक, झांसी राणी चौक, एस.बी.आय.चे प्रांगण इत्यादी ठिकाणी झाले. इ- पोस्टर राष्ट्रीय स्पर्धा सादरीकरण सुद्धा आभासी पद्धतीने घेण्यात आली. महाविद्यालयाचे रासेयो अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन यांनी सर्व विद्यार्थ्यांना औषध निर्मात्याची शपथ तहसील कार्यालयाच्या भव्य पटांगणात दिली. संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र पिसे व प्राचार्य डॉ. सचिन दुधे यांनी उत्कृष्ट आयोजनाबद्दल सर्वांचे अभिनंदन केले.

# एलएमबी स्कुलमध्ये SST EXPO प्रदर्शनी

ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेद्वारा संचालित एल. एम. बी. पब्लिक











स्कुल, ब्रम्हपुरी येथे दि. २७ सप्टेंबर २०२५ रोज शनिवारला सामाजिक शास्त्र SST या विषयावर आधारित विद्यार्थ्यांकरिता SST एक्सपो प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनीमध्ये वर्ग ६ ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत विविध प्रकारच्या सुंदर प्रतिकृती तयार केल्या. यामध्ये वर्ग ६ ते ८ वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.

SST एक्सपो प्रदर्शनीचे उद्घाटन एल. एम. बी. पब्लिक स्कुलचे अध्यक्ष अशोकजी भैया सर यांचे हस्ते पार पडले. याप्रसंगी सुनिता भैया मॅडम, संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम तसेच SST विषय शिक्षक उपस्थित होते. प्रसंगी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या प्रदर्शनीमध्ये SST विषयातील विविध घटकांवर आधारित सुंदर प्रतिकृती तयार केल्या. यात भारतीय संसद, शनिवार वाडा, मूलभूत हक्क, विविध किल्ले, धार्मिक स्थळे, भारतीय नद्या, पर्वत, पर्जन्यजल साठवण, डिजिटल पेमेंट प्रणाली, प्राणीजीवन, विद्यापीठ, लिंग समानता, भूकवच, मृदा, वाळवंट, धरणे, अर्थव्यवस्था, भूकंप प्रतिरोधक संरचना, न्यायव्यवस्था, सिंचन प्रणाली, इवीएम मॉडेल, पर्जन्य प्रकार इत्यादी विषयांवर SST प्रदर्शनात अभिनव प्रकल्प सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या सर्व विषयांवर विद्यार्थ्यांनी उत्तम माहिती दिली. या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, शोध-वृत्ती व सर्जनशिलता विकसित होते.

याप्रसंगी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था ब्रम्हपुरी येथील ने. हि. मुलांची शाळा तसेच ने. हि. कन्या विद्यालय येथील सामाजिक शास्त्र विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या प्रदर्शनाची पाहणी केली. विद्यार्थ्यांनी अप्रतिम प्रदर्शन करून त्यांची सर्जनशीलता आणि त्यांनी ज्ञानाने बनवलेल्या प्रकल्पाची केवळ वैज्ञानिक तत्वेच दाखवली नाहीत सर त्यांची कलात्मकताही दाखविली. वैविध्यपूर्ण कलाकृतींच्या या प्रदर्शनामध्ये समावेश पाहून उपस्थित सर्व अतिथी, पालक व शिक्षकांनी विद्यार्थी कलाकाराचे कौतुक केले. या प्रदर्शनाच्या आयोजनासाठी शाळेच्या सर्व SST शिक्षकांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी सहकार्य केले. कार्यकमाचे संचालन व आभार प्रदर्शन वेदांती मॅडम यांनी केले.

# ब्रम्हपुरी पं.स. सभापती पदासाठी आरक्षण "सर्वसाधारण"


ब्रह्मपुरी/का.प्र.

जिल्हा परिषद अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर आज बुधवार ०१ आक्टोंबर २०२५ ला ब्रम्हपुरी पंचायत समिती सभापतीपदाचे आरक्षण अखेर जाहीर झाले असून ब्रह्मपुरी पंचायत समितीचे सभापतीपद पद हे ''सर्वसाधारण'' प्रवर्गातील उमेदवारासाठी राखीव करण्यात आले आहे. या निर्णयामुळे स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांना सुरुवात होणार असून, गावखेड्यातील इच्छुक नेत्यांसाठी राजकीय संधीचे नवे दालन खुले झाले आहे.

आरक्षण जाहीर होताच संभाव्य उमेदवारांमध्ये हालचाली सुरू झाल्या आहेत. गाव खेड्यातील प्रभावी नेत्यांकडून मोर्चेबांधणीला वेग येणार आहे. यापूर्वीच पंचायत समितीच्या सत्ताधारी व विरोधी गटांनी या पदासाठी गुप्त हालचाली सुरू केल्या आहेत. आता अधिकृत आरक्षण जाहीर झाल्यामुळे स्थानिक नेत्यांनी आपल्या गटबांधणीला प्रारंभ केला आहे. सभापती पदासाठी सर्वसाधारण आरक्षण असल्यामुळे गावागावांतून विविध नेत्यांच्या नावांची चर्चा सुरू झाली आहे. कोणत्या पक्षाकडून कोणत्या उमेदवाराला संधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आरक्षणाचा फायदा मिळवण्यासाठी पक्षांतर्गत चढाओढ होण्याची शक्यता देखील नाकरता येत नाही. राजकीय वर्तुळात सध्या 'आता खरी कसोटी नेत्यांची' अशीच चर्चा रंगली असून पुढील काही दिवसांत मोर्चेबांधणी, बैठका, पक्षांतर व गटबाजी याला वेग येणार हे निश्चित झाले आहे.

## इच्छूकाची भाऊगर्दी वाढली?

अनेक जण बऱ्याच दिवसापासून सभापती पदासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून तयार होते. मीच सभापती होणार असल्याचे गाव खेड्यात चित्र तयार होऊ लागले आहे.

Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर

मो. 8806776699, 9834946501


डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



प्रो.प्रा. सुरेश सोरते

मो. 8698323337

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स



गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर

नागभीड रोड, ब्रम्हपुरी

रेलींग, ग्रिल व गेट

स्टिलचे नावे बनवून मिळेल.




# जगातील दुसऱ्या क्रमांकाची ठेंगणी...

(पान क्र. १ वरून)

या उद्देशाने त्या युवकांनी विश्व विक्रमांची नोंद करणाऱ्यांकडे कागदोपत्री पाठपुरावा केला. त्यात त्यांना यश मिळाले. तिची नोंद जागतिक संस्थेने घेत तिला अधिकृत सर्टिफिकेट व मेडल जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते ज्ञानेश्वरीला हे प्रमाणपत्र देण्यात आले.


या ऐतिहासिक कामगीरीमुळे ब्रम्हपुरी व चंद्रपूर जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकले आहे. कमी उंचीमुळे अनेकदा लोकांकडून अनेकदा तिची टिंगल टिवाळी केली जाते. लोक गंमतही करतात. मात्र, त्याचे तिला काहीही वाटत नाही. आज कमी उंची असल्यामुळेच जगातील सर्वात कमी उंचीची महिला अशी नोंद घेतल्या गेल्याचे ती आनंदाने सांगते.

"मला कधी वाटले नव्हते की माझी कमजोरीच माझी ताकद बनेल. अलंकार व योगेश यांच्या मदतीने मला हा किताब मिळाला आहे. माझे आई-बाबा आणि संपूर्ण कुटूंब आनंदी आहे. आम आदमी पार्टी चंद्रपूर यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आणि जिल्हाधिकारी साहेबांनी स्वत:च्या हस्ते सन्मान दिल्याबद्दल मी मनपूर्वक आभार मानते." अशी प्रतिक्रिया ज्ञानेश्वरी दुनेदार हिने व्यक्त केली.

# चंद्रपूर जिल्ह्यात ओला...

(पान क्र. १ वरून)

झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही या वेळी काँग्रेस पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे. निवेदन देतांना तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, कृउबा सभापती प्रभाकर सेलोकर, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, माजी जि.प.सदस्य डॉ. राजेश कांबळे, माजी जि.प. सदस्य प्रमोद चिमुरकर, प्रदेश काँग्रेस सचिव डॉ. थानेश्वर कायरकर, युवक काँग्रेसचे अध्यक्ष सोनू नाकतोडे, नेताजी मेश्राम, शहर काँग्रेस कार्याध्यक्ष सुधाकर पोपटे, महीला काँग्रेस तालुकाध्यक्ष मंगलाताई लोनबले, महीला काँग्रेस शहराध्यक्ष योगिताताई आमले यांसह काँग्रेस तालुका, शहर काँग्रेस, युवक काँग्रेस, महीला काँग्रेस, पक्षाच्या सर्व फ्रंटल ऑर्गनाईजेशनचे व सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Lubi PUMPS-MOTORS

बुधवार बंद

- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

Kirloskar

CRI

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान

1994 पासून आपल्या सेवेत

किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404